   h. The manner of voting remotely for members holding shares in dematerialized mode, physical mode and for members who have not registered their email addresses is provided in the Notice of the AGM. The details will also be made available on the website of the Company. Members are requested to visit www.firstsource.com to obtain such details;
   i. Members who have not registered their email addresses are requested to register their email addresses with their relevant depositories through depository participant(s) and members holding shares in physical mode are requested to update their email addresses with Company's Registrar and Share Transfer Agent, 3i Infotech Limited, at fsl@3i-infotech.com to receive electronic copies of the Annual Report 2025-26 along with the Notice of the 25th AGM, instructions for remote e-voting and instructions for participation in the AGM through VC;
   j. In case you have any queries or issues regarding e-voting, you may refer the Frequently Asked Questions ("FAQs") and e-voting manual available at www.evotingindia.com, under help section or write an email to helpdesk.evoting@cdslindia.com or call toll free no. 1800 21 09911;
   k. All grievances connected with the facility for voting by electronic means may be addressed to Mr. Rakesh Dalvi, Sr. Manager, (CDSL,) Central Depository Services (India) Limited, A Wing, 25th Floor, Marathon Futurex, Mafatlal Mill Compounds, N M Joshi Marg, Lower Parel (East), Mumbai - 400013 or send an email to helpdesk.evoting@cdslindia.com or call at toll free no. 1800 21 09911.

For Firstsource Solutions Limited
On behalf of the Board of Directors
Sd/-
Pooja Nambiar
Company Secretary

Place: Mumbai
Date: 14th July, 2026

उष्णतेचा मुलांच्या मेंदूच्या विकासावर परिणाम

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : गर्भावस्थेदरम्यान आणि सुरुवातीच्या बालपणात अतिउष्णतेच्या (तापमानाच्या) संपर्कात आल्यामुळे मुलांच्या मेंदूतील 'थॅलेमस' या माहिती प्रक्रिया केंद्राची वाढ मंदावू शकते, असा दावा एका अभ्यासात करण्यात आला आहे. 'एन्व्हायर्नमेंट इंटरनॅशनल' या नियतकालिकामध्ये हे संशोधन प्रसिद्ध झाले असून, स्पेनमधील 'बार्सिलोना इन्स्टिट्यूट फॉर ग्लोबल हेल्थ'च्या संशोधकांच्या नेतृत्वात हे संशोधन करण्यात आले आहे.

थॅलेमस हा भाग ज्ञानेंद्रिये आणि हालचालींशी संबंधित माहितीवर प्रक्रिया करून ती मेंदूच्या मुख्य भागापर्यंत पोहोचवण्याचे काम करतो. संशोधनानुसार, थॅलेमसची वाढ मंदावल्यामुळे मुलांमध्ये किशोरवयात आक्रमकता आणि नियम मोडणे यांसारखी वर्तणूकविषयक लक्षणे दिसून आली आहेत. मात्र, यामुळे मुलांच्या बौद्धिक क्षमतेवर कोणताही परिणाम झालेला आढळला नाही.

नेदरलँड्समधील 'जनरेशन आर स्टडी' अंतर्गत ३,२५१ मुलांवर हा अभ्यास करण्यात आला. १२.५ अंश सेल्सिअस या संदर्भ (सरासरी) तापमानाशी तुलना करता, या संवेदनशील काळात दिवस-रात्रीचे सरासरी तापमान २०.५ अंश सेल्सिअस राहिल्यास, मुलांच्या वयाच्या ९ ते १५ वर्षांदरम्यान थॅलेमसची वाढ मंदावल्याचे दिसून आले.

डॉक्टर मारहाण प्रकरणात रमेश म्हात्रे यांना जामीन

५० हजारांच्या जातमुचलक्यावर न्यायालयाचा दिलासा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

कल्याण : पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांना मारहाण केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले डोंबिवली कोपर प्रभागाचे शिंदे गटाचे नगरसेवक रमेश सुकऱ्या म्हात्रे यांना मंगळवारी जामीन मंजूर झाला आहे. दरम्यान, म्हात्रे यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, डोंबिवलीहून रुग्णालयापर्यंतचा प्रवास त्यांनी खासगी वाहनातून केल्याची जोरदार चर्चा आहे.

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश के. एस. कातकडे यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी बचाव पक्ष, पोलीस अभियोक्ता आणि पोलिसांचे म्हणणे ऐकून न्यायालयाने म्हात्रे यांना ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. उर्वरित तीन आरोपींच्या जामीन अर्जावर बुधवारी सुनावणी होणार आहे. रमेश पवार, अक्षय कारंडे आणि प्रमोद निकम यांचा मुक्काम मात्र तुरुंगातच असणार आहे.

रुग्णालयातील अनेक कर्मचाऱ्यांनी म्हात्रे खासगी वाहनातून आल्याचे खात्रीपूर्वक सांगितले. मात्र, पोलिसांनी ही चर्चा फेटाळून लावली. आम्ही आवश्यक ती सर्व प्रक्रिया पूर्ण करून म्हात्रे यांना पोलीस बंदोबस्तात नेले, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

जामिनासाठी बिघडलेल्या प्रकृतीचे कारण

म्हात्रे यांच्या दोन दिवसांच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपली. न्यायालयाने म्हात्रे यांच्यासह तीन आरोपींना २४ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. त्यानंतर तिन्ही आरोपींना आधारवाडी तुरुंगात नेण्यात आले. यानंतर म्हात्रे यांच्या वतीने वकिलांनी तातडीने जामिनासाठी अर्ज दाखल केला. या अर्जात म्हात्रे यांची बिघडलेली प्रकृती आणि उच्च रक्तदाब ही कारणे नमूद करण्यात आली होती.

डॉक्टर आंदोलनाच्या पवित्र्यात

डॉक्टरांना नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी मारहाण केल्याच्या घटनेचे देशभर तीव्र पडसाद उमटले असून, या प्रकरणी देशव्यापी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र शाखेने १६ जुलै रोजी आपत्कालीन ऑनलाइन बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीत देशभरातील आरोग्य सेवा बंद ठेवण्याच्या प्रस्तावासह विविध आंदोलनात्मक पर्यायांवर चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्य शासन आणि केंद्र सरकारने या प्रकरणात कठोर भूमिका घेऊन दोषींवर कडक कारवाई करावी, या मागणीसाठी आयएमएने पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांकडेही तक्रारी पाठवत दोषींवर जलद कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> कर्तव्य बजावत असताना रुग्णालयात घुसून डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना मारहाण करणे कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. डोंबिवलीतील घटनेविषयी देशभरातील डॉक्टर आक्रमक आहेत. दोषींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत.
>
> – डॉ. मंगेश पाटे, ज्येष्ठ डॉक्टर, डोंबिवली

करार संपल्यानंतर लाभांची मागणी चुकीची

उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मालक आणि कर्मचारी यांच्यातील सेवा करार संपुष्टात आल्यानंतर किंवा अस्तित्वात नसताना प्रसूती रजा व संबंधित लाभांची मागणी करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. हंगामी करारावरील नियुक्तीची मुदत संपल्यानंतर प्रसूती झालेल्या एका प्राध्यापिकेला प्रसूती लाभ देण्याचे संबंधित प्राधिकरणाचे आदेश रद्द करत न्यायालयाने हा निर्णय दिला.

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने प्रसूती रजेचा हक्क तपासताना संबंधित महिलेची रोजगारस्थिती आणि कायद्याची चौकट विचारात घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. मातृत्वाचा सन्मान, माता, बालकांच्या आरोग्याचे संरक्षण महत्त्वाचे असले तरी प्रसूती लाभ हे मालक-कर्मचारी संबंधांशी निगडित अधिकार असल्याचे न्यायालयाने नमूद केले. प्रकरणातील प्राध्यापिकेची हंगामी नियुक्ती संपल्यानंतर तिची प्रसूती झाली होती.

प्रकरण काय ?

कामगार सहाय्यक आयुक्त आणि अपिलीय प्राधिकरणाने महाविद्यालयाला संबंधित प्राध्यापिकेला २.४३ लाख रुपये प्रसूती लाभ देण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला महाविद्यालयाने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ते मान्य करत न्यायालयाने प्राधिकरणाचे आदेश रद्द केले.

अनैतिक संबंधात अडथळा; प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या

११ महिन्यांनंतर ऐरोलीतील हत्येचा उलगडा

लोकसत्ता प्रतिनिधी

नवी मुंबई : ऐरोलीतील यादवनगर परिसरात सुमारे ११ महिन्यांपूर्वी घडलेल्या एका थरारक हत्याकांडाचा अखेर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी उलगडा केला आहे. बेपत्ता व्यक्तीच्या तक्रारीच्या तपासातून समोर आलेल्या या प्रकरणात, अनैतिक संबंधांत पती अडथळा ठरत असल्याच्या संशयातून पत्नीने तिच्या प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. हत्येनंतर पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेहाचे मुंडके, धड व पाय असे तीन तुकडे करून चादर व गोणीत भरत रिक्षातून निर्जनस्थळी टाकल्याचेही तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी बलीराम सूर्यनाथ कुशवाह (५०) यांच्या हत्येप्रकरणी पत्नी सुनिता बलीराम कुशवाह (४०) आणि तिचा कथित प्रियकर राहुल दशरथ प्रजापती (३०) यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने दोघांना १७ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

२४ एप्रिल २०२६ रोजी बलीराम यांचे भाऊ हरेराम कुशवाह यांनी रबाळे पोलीस ठाण्यात बलीराम बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती.

मोबाईलच्या विश्लेषणातून सुनिता हिचे रिक्षाचालक राहुल प्रजापती याच्याशी प्रेमसंबंध असल्याचे समोर आले. दोघांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यांच्या जबाबांतील विसंगतीनंतर झालेल्या चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

या प्रकरणी रबाळे एमआयडीसी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) (खून), कलम २३८ (गुन्ह्याचे पुरावे नष्ट करणे) आणि कलम ३ (५) (सामूहिक हेतूने गुन्हा करणे) अन्वये १० जुलै रोजी गुन्हा दाखल केला.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे, पोलीस उपायुक्त विजय खरात आणि सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास कठाळे यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक (गुन्हे) कल्पना जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रोडेकर, तसेच सतीश बाड, अरुण राक्षे, संजय कांबळे, डेरे, विनोद भुयाळ, संतोष काकड, दीपक वरलडे आणि प्रवीण भासले यांनी या गुन्ह्याचा उलगडा केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) कल्पना जाधव करीत आहेत.

झोपेत असताना धारदार शस्त्राने हल्ला

पोलिसांच्या माहितीनुसार, ८ ऑगस्ट २०२५ च्या रात्री ते ९ ऑगस्टच्या पहाटेदरम्यान बलीराम झोपेत असताना त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून हत्या करण्यात आली. त्यानंतर घरातच मृतदेहाचे तीन तुकडे करून ते चादर व गोणीत भरून राहुलच्या रिक्षातून गवळी देव परिसरातील निर्जनस्थळी टाकण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर सुनिताने घर भाड्याने दिले आणि मुलांसह राहुलबरोबर वास्तव्यास गेल्याचे पोलिसांनी सांगितले.

> आरोपींना न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या कालावधीत गुन्ह्याचा सर्वंकष तपास सुरू असून, पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे.
>
> –विजय खरात, पोलीस उपायुक्त, परिमंडळ १

'दाखल्यात माजी पतीऐवजी जैविक पित्याचे नाव नोंदवा'

मुंबई : मुलीच्या जन्मदाखल्यातील माजी पतीचे नाव वगळून त्याऐवजी जैविक पित्याचे नाव नोंदवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेला दिले. मुलीचे पितृत्व सिद्ध करणारा डीएनए अहवाल व जैविक पालक असल्याचे सांगणारे पालकांचे प्रतिज्ञापत्र ग्राह्य धरत प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. याचिकाकर्तीचा २००६ मध्ये विवाह झाला होता. मतभेद झाल्यानंतर पती-पत्नी वेगळे राहत होते. त्याच काळात तिचे दुसऱ्या व्यक्तीशी संबंध प्रस्थापित झाले होते.

अधिकाऱ्यांना वाचविण्याचा पालिकेचा प्रयत्न

न्यायालयाची नाराजी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे चार हजारहून अधिक बेकायदा इमारतींप्रकरणी आयुक्तांनी जवळपास २९५ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तथापि, अशा पद्धतीने कारवाई केली गेल्यास पुढील ३० वर्षे या अधिकाऱ्यांना काहीच होणार नाही, असे ताशेरे ओढून न्यायालयाने त्याबाबत नाराजी व्यक्त केली.

महापालिकेची प्रस्तावित कारवाई म्हणजे एकप्रकारे संबंधित अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठीचा किंवा त्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न असल्याचे ताशेरेही न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठने ओढले.

आम्हाला कारणे सांगू नका, काय कारवाई करणार ते सांगा. निदान पाच अधिकाऱ्यांवर कारवाई करा. नेमकी काय कठोर कारवाई करणार ते स्पष्ट करा, असे आदेश न्यायालयाने महापालिकेला दिले आहेत.

तीन नामांकित हॉटेलचे परवाने निलंबित

स्वच्छता व अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन उघड

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मुंबईतील नामांकित हॉटेलांवर कारवाईचा बडगा उगारत भेंडीबाजारमधील शालिमार हॉटेल, नूर मोहम्मदी हॉटेल आणि उमरखाडीतील रहमानिया रेस्टॉरंट यांचे अन्न परवाने निलंबित केले आहेत. स्वच्छतेचा अभाव, अन्नसुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन, कच्च्या मालाच्या नोंदी नसणे, पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेच्या चाचण्या न करणे, कीटक प्रतिबंधक उपायांचा अभाव व अन्नसाठवणुकीतील गंभीर त्रुटी आढळल्याने ही कारवाई करण्यात आली.

शालिमार हॉटेलमध्ये स्वयंपाकघरातील अस्वच्छता, खाद्यतेलाच्या गुणवत्तेची नोंद नसणे, शाकाहारी आणि मांसाहारी अन्नाच्या स्वतंत्र हाताळणीचा अभाव तसेच कीटकांचा प्रवेश अशा बाबी निदर्शनास आल्या. नूर मोहम्मदी हॉटेलमध्ये स्वयंपाकघराच्या छतावर तेलाचे जाड थर, माशा, कीटक आणि पक्ष्यांचा मुक्त प्रवेश, अस्वच्छ भांडी आढळली. रहमानिया रेस्टॉरंटमध्येही अन्नसाठवणुकीतील त्रुटी, गंजलेली उपकरणे, भिंती व छतांची दुरवस्था, कीटकप्रतिबंधक उपायांचा अभाव आणि अन्न व पाण्याच्या आवश्यक चाचण्यांच्या नोंदी नसल्याचे आढळले.

सार्वजनिक सूचना

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ४ जुलै २०२२ रोजी (RBI/2022-23/80 CO.DPSS.POLC.No.S-590/02-14-006/2022-23) जारी केलेल्या "नॉन-बँक पीएसओचे अधिग्रहण / नियंत्रण मिळवणे आणि नॉन-बँक पीएसओच्या पेमेंट सिस्टम उपक्रमाची विक्री / हस्तांतरण या प्रकरणी पूर्व मंजुरी मिळवण्याची आवश्यकता" या शीर्षकाच्या निर्देशातील परिच्छेद ३ (i), परिशिष्ट १ सह वाचल्या जाणाऱ्या परिच्छेद ४ (ii), परिशिष्ट १ च्या अनुषंगाने वर्ल्डलाईन ई-पेमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड **("डब्ल्यूईआयपीएल")** आणि Indialdeas.com लिमिटेड **("बिलडेस्क")** यांच्या द्वारे ही सार्वजनिक सूचना संयुक्तपणे सर्वसामान्य जनता, ग्राहक, व्यापारी, एजंट, विक्रेते आणि इतर सर्व संबंधित भागधारकांसाठी जारी करण्यात येत आहे.

डब्ल्यूईआयपीएल ही एक नॉन-बँक पेमेंट सिस्टम ऑपरेटर (पीएसओ) आहे. जिच्याकडे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम्स ॲक्ट, २००७ अंतर्गत (अ) पेमेंट एग्रिगेटर - ऑनलाइन; (ब) पेमेंट एग्रिगेटर क्रॉस-बॉर्डर (आंतरराष्ट्रीय आवक आणि जावक व्यवहारांची सुविधा देणारे); आणि (क) भारत बिल पेमेंट ऑपरेटिंग युनिट या स्वरूपात काम करण्यासाठी जारी केलेली प्राधिकृत प्रमाणपत्रे आहेत आणि कंपनी या अधिकारांतर्गत आपला व्यवसाय चालवते: डब्ल्यूईआयपीएलच्या भागधारकांनी (म्हणजेच, 'वर्ल्डलाईन ई-कॉमर्स सोल्यूशन्स बीव्ही/एसआरएल आणि रिटेल इंटरनॅशनल होल्डिंग एस.ए.एस. **("सेलर्स विक्रेते")** बिलडेस्कसोबत खरेदी-विक्री करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारांतर्गत, बिलडेस्कने विक्रेत्यांकडून डब्ल्यूईआयपीएलचे १०० टक्के शेअर्स (भागभांडवल) आत्मसात करण्याचे मान्य केले आहे (ज्याला **"ट्रान्झॅक्शन (व्यवहार)"** म्हटले गेले आहे).

या व्यवहाराचा मुख्य उद्देश दोन्ही संस्थांमधील पेमेंट चॅनेल्स, भागीदारी, पद्धती आणि व्यावसायिक क्षमतांमध्ये प्रबळ समन्वय निर्माण करणे हा आहे.

हा व्यवहार पूर्ण झाल्यावर डब्ल्यूईआयपीएलचे नियंत्रण, भागभांडवल, संचालक मंडळाची रचना आणि कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये बदल होणार आहे.

विद्यमान व्यापारी, ग्राहक किंवा एजंट्सना दिल्या जाणाऱ्या चालू सेवांमध्ये कोणताही व्यत्यय येणार नाही. डब्ल्यूईआयपीएलचे सर्व कामकाज लागू असलेले कायदे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करून पूर्वीप्रमाणेच व्यवस्थापित केले जाईल.

ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून किमान १५ दिवसांनंतर हा व्यवहार पूर्ण केला जाईल.

या सूचनेची एक प्रत डब्ल्यूईआयपीएलची वेबसाइट (संकेतस्थळ) www.worldline.com/india आणि बिलडेस्कची वेबसाइट (संकेतस्थळ) www.billdesk.com वर देखील उपलब्ध आहे.

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

INDIA'S LARGEST CONTAINER PORT — जनेप प्राधिकरण JNPA — DEVELOPED INDIA MISSION

(बंदर नियोजन आणि विकास विभाग)

ISO 9001:2015, ISO 14001:2015, ISO 45001:2018, ISO 27001:2013 CERTIFIED

संक्षिप्त ई-निविदा सूचना

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण (JNPA) खालील कामांसाठी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या किमान पात्रता निकष (MQC) पूर्ण करणाऱ्या पात्र आणि अनुभवी कंत्राटदारांकडून दोन-कव्हर प्रणाली द्वारे ऑनलाइन टक्केवारी-दरावर आधारित ई-निविदा आमंत्रित करत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जीएसटी वगळून)
१	जेएनपीए येथील करळ जंक्शनजवळ टीटी (TT) साठी पार्किंग क्रमांक ६ चे बांधकाम. **निविदा क्र.** PPD/DGM-I/Parking/T–२६/२०२६ दिनांक १४.०७.२०२६	रु. १९,७९,७५,०००.००
२	जेएन पोर्टमधील फुंडे रोडच्या बाजूला वाटप केलेल्या भूखंडांसाठी डांबरी रस्ता आणि सांडपाणी (ड्रेनेज) वाहिनीचे बांधकाम. **निविदा क्र.** PPD/DGM/Internal Road/T–२५/२०२६ दिनांक १४.०७.२०२६	रु. ३५,४४,७४,०००.००

- काम पूर्ण करण्याचा कालावधी: निविदा दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे १५ दिवसांचा मोबिलायझेशन (पूर्व-तयारी) कालावधी आणि निर्धारित पावसाळा कालावधी वगळून ०८ महिने.
- निविदा शुल्क: २३,६००/– (ना परतावा), प्रत्येकी RTGS/NEFT द्वारे देय.
- निविदा दस्तऐवज मिळण्याची मुदत: १५.०७.२०२६ ते १२.०८.२०२६.
- ऑनलाइन निविदा (Bid) सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १२.०८.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यंत.

टीप: पात्रता निकष, बोली अटी आणि निविदा दस्तऐवजांसह सविस्तर निविदा सूचना (NIT), जेएनपीएच्या संकेतस्थळावर **www.jnport.gov.in** आणि सेंट्रल पब्लिक प्रोक्युरमेंट पोर्टलवर **https://eprocure.gov.in** उपलब्ध आहे.

मुख्य महाव्यवस्थापक
बंदर नियोजन आणि विकास विभाग

कॅमलिन फाईन सायन्सेस लिमिटेड

CFS Camlin Fine Sciences

सीआयएन: एल७४१००एमएच१९९३पीएलसी०७५३६१
नोंदणीकृत कार्यालय: मजला २ ते ५, ''जी. एस. पॉईंट'' येथील इमारत, सी.एस.टी. रोड, कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८, भारत.
टेलि.: ९१-२२-६७००१०००; **फॅक्स:** ९१-२२-२८३२४४०४;
ईमेल: secretarial@camlinfs.com; **वेबसाइट:** www.camlinfs.com

३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची जाहीर सूचना

याद्वारे कळविण्यात येते की कॅमलिन फाईन सायन्सेस लिमिटेड (''**कंपनी**'')च्या सदस्यांची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''**एजीएम**''/''**सभा**''), एजीएम बोलावण्याच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी, **मंगळवार, दि. ११ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे (''ओएव्हीएम'')** आयोजित केली जाईल. सदर हे कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम, दिनांकित ८ एप्रिल, २०२० चे परिपत्रक आणि सदर या संदर्भात जारी केलेले त्यानंतरचे परिपत्रक, ज्यापैकी सर्वात नवीन दिनांकित २२ सप्टेंबर, २०२५ चे आहे (सामूहिकपणे ''**एमसीए परिपत्रके**'' म्हणून संदर्भित), आणि सेबी (लिस्टिंग दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५ (''**सेबी लिस्टिंग नियमन**''), दिनांकित ३ ऑक्टोबर, २०२४ चे सेबी परिपत्रक आणि या संदर्भात जारी केलेली इतर लागू परिपत्रके (सामूहिकपणे ''**सेबी परिपत्रके**'' म्हणून संदर्भित) यांच्या लागू तरतुदींच्या अनुपालनात आहे.

एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांच्या अनुपालनानुसार, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना वार्षिक अहवाल २०२५-२६ सोबत त्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवली जाईल, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी / रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (''**रजिस्ट्रार**'' किंवा ''**आरटीए**'') / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (''**डीपी**'') यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. याव्यतिरिक्त, सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ३६(१)(ब) यानुसार, ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनी/आरटीए/डीपी यांच्याकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांना एक पत्र पाठवले जाईल, ज्यामध्ये कंपनीच्या वेबसाइटची वेबलिंक दिलेली असेल, जिथून वित्तीय वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल पाहता येईल. कंपनी, ज्या सदस्यांनी विनंती केली आहे, त्यांना त्यांचा फोलिओ क्रमांक / डीपी आयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून, secretarial@camlinfs.com वर वार्षिक अहवालाची छापील प्रत पाठवेल.

सदस्यांनी नोंद घ्यावी की, सूचना आणि वार्षिक अहवाल २०२५-२६ हे कंपनीची वेबसाईट https://www.camlinfs.com/ यावर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''**एनएसडीएल**'') (रिमोट ई-व्होटिंग सुविधा पुरवणारी एजन्सी) यांची वेबसाईट www.evoting.nsdl.com यावर देखील उपलब्ध असतील. याव्यतिरिक्त, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ज्या स्टॉक एक्सचेंजवर कंपनीचे रोखे सूचीबद्ध आहेत, म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड, यांच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या वेबसाईटवर देखील उपलब्ध असेल.

ज्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता आणि इतर केवायसी तपशील नोंदवलेले नाहीत:

शेअर्स डिमॅटेरिअलाईज्ड स्वरूपात धारण केले असल्यास, त्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्समार्फत संबंधित डिपॉझिटरीजकडे त्यांची नोंदणी करावी अशी विनंती आहे.

जर शेअर्स फिजिकल स्वरूपात धारण केले असतील, तर ते फॉर्म आयएसआर-१ आणि सेबी यांनी विहित केलेले इतर संबंधित फॉर्म, कंपनीचे आरटीए, एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रा. लि., (आधी लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि. या नावाने ओळखले जाणारे) यांच्याकडे सादर करावेत. सदर फॉर्म कंपनीच्या https://www.camlinfs.com/investor-relations/home/downloads या वेबसाइटवर आणि आरटीएच्या https://web.in.mpms.mufg. com/KYC-downloads.html या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजांवर सदस्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे दूरस्थपणे मतदान करण्याची संधी मिळेल. डिमटेरियलाइज्ड आणि फिजिकल स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांसाठी, तसेच ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांच्यासाठी दूरस्थपणे मतदान करण्याची पद्धत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत उपलब्ध असेल. याचा तपशील https://www.evoting.nsdl.com किंवा https://www.camlinfs.com/ यावर देखील उपलब्ध करून दिला जाईल किंवा evoting@nsdl.com, secretarial@camlinfs.com, rnt.helpdesk@in.mpms.mufg.com यावर किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात विनंती पाठवून तो मिळवता येईल. निर्देशित कायद्याच्या कलम १०३ अन्वये गणपूर्ती मोजण्याच्या उद्देशाने, व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सभेला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना केली जाईल.

कॅमलिन फाईन सायन्सेस लिमिटेड यांच्यासाठी
सही/–
ठिकाण: मुंबई — **राहुल सावळे**
दिनांक: १४ जुलै, २०२६ — **कंपनी सचिव आणि व्ही. पी. लीगल**

फर्स्टसोर्स सोल्युशन्स लिमिटेड

RP - Sanjiv Goenka Group — Growing Legacies — firstsource

CIN: L64202MH2001PLC134147
नोंदणीकृत कार्यालय: पहिला मजला, एथेना टॉवर्स, माइंडस्पेस मालाड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई – ४०० ०६३ भारत
दूरध्वनी: + ९१ (२२) ६६६६ ०८८८, **संकेतस्थळ:** www.firstsource.com
ई-मेल: fsl@3i-infotech.com/complianceofficer@firstsource.com

२५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाबाबतची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की:

१. फर्स्टसोर्स सोल्युशन्स लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता (भाप्रवे)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (व्हीसी) आयोजित केली जाईल. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेले सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२०, १७/२०२० आणि सर्वात अलीकडील ०३/२०२५, तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने जारी केलेले परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/CMD/CIR/P/2020/242, SEBI/HO/CFD/PoD2/CIR/P/2023/120 (या सर्वांचा एकत्रितपणे 'परिपत्रके' असा उल्लेख केला आहे) यांच्या अनुपालनानुसार, कंपन्यांना सदस्यांच्या एका सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे, ६ मे २०२६ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित केली जात आहे.

२. तसेच, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('सेबी एलओडीआर') च्या नियम ३६(१)(ल) नुसार, ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल आयडी नोंदवलेले नाहीत, त्यांना वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेब-लिंक असलेले पत्र पाठवले जात आहे.

३. संबंधित परिपत्रकांचे पालन करून, ज्या सदस्यांचे ई-मेल आयडी डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स)कडे नोंदवलेले आहेत, त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२५-२६ च्या इलेक्ट्रॉनिक प्रती पाठवण्यात आल्या आहेत. हे दस्तऐवज कंपनीच्या www.firstsource.com/investor-relations/ या संकेतस्थळावर, तसेच एनएसई www.nseindia.com आणि बीएसई www.bseindia.com च्या संकेतस्थळांवर आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') च्या www.evotingindia.com या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत. ई-मेलद्वारे एजीएम ची सूचना पाठवण्याची प्रक्रिया १४ जुलै, २०२६ रोजी पूर्ण झाली आहे.

४. 'कट-ऑफ' तारखेला, म्हणजेच गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी, प्रत्यक्ष किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य, एजीएम च्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर सीडीएसएल च्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे ('रिमोट ई-व्होटिंग') इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात. सदस्यांना याद्वारे सूचित केले जाते की:

ए. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज 'रिमोट ई-व्होटिंग' (दूरस्थ ई-मतदान) किंवा सभेदरम्यानच्या ई-व्होटिंग प्रणालीद्वारे पार पाडले जाऊ शकते;

बी. रिमोट ई-व्होटिंग किंवा सभेदरम्यानच्या ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याच्या पात्रतेचे निर्धारण करण्यासाठी 'कट-ऑफ तारीख' (अंतिम पात्रता तारीख) गुरुवार, ३० जुलै २०२६ ही असेल;

सी. रिमोट ई-व्होटिंगची प्रक्रिया शनिवार, १ ऑगस्ट २०२६ रोजी (सकाळी ९:०० वाजता, भाप्रवे) सुरू होईल;

डी. रिमोट ई-व्होटिंगची प्रक्रिया बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ रोजी (संध्याकाळी ५:०० वाजता, भाप्रवे) समाप्त होईल;

ई. बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजल्यानंतर (भाप्रवे) रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल बंद केले जाईल;

एफ. ज्या व्यक्तींकडे 'फिजिकल' स्वरूपात (कागदी प्रमाणपत्राच्या स्वरूपात) शेअर्स आहेत आणि जे 'नॉन-इंडिव्हिज्युअल' (व्यक्तीव्यतिरिक्त इतर) भागधारक आहेत आणि ज्यांनी सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स मिळवले आहेत व कट-ऑफ तारखेला (म्हणजेच गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी) ते कंपनीचे सदस्य आहेत असे भागधारक helpdesk.evoting@cdslindia.com या ईमेलवर विनंती पाठवून 'लॉगिन आयडी' आणि 'पासवर्ड' मिळवू शकतात. तथापि, जर एखादी व्यक्ती रिमोट ई-व्होटिंगसाठी सीडीएसएल कडे आधीच नोंदणीकृत असेल, तर मतदानासाठी त्यांचा विद्यमान 'युजर आयडी' आणि 'पासवर्ड' वापरला जाऊ शकतो. 'डीमॅट' स्वरूपात सिक्युरिटीज (शेअर्स) धारण करणाऱ्या आणि सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स मिळवून सदस्य बनलेल्या वैयक्तिक भागधारकांसाठी जे कट-ऑफ तारखेला (म्हणजेच गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी) शेअर्स धारण करत आहेतङ्खत्यांनी एजीएम च्या सूचनेमध्ये 'रिमोट ई-व्होटिंग, एजीएम दरम्यान ई-व्होटिंग आणि व्हीसी / ओव्हीएएम द्वारे बैठकीत सहभागी होण्याबाबत भागधारकांसाठी सूचना' या शीर्षकाखाली दिलेल्या पायऱ्यांचे पालन करावे;

जी. सदस्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी: अ) एकदा का सदस्याने एखाद्या ठरावावर मतदान केले की, त्यानंतर त्यांना ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही; ब) वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान देखील मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. जे सदस्य व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधेद्वारे सभेत उपस्थित आहेत आणि ज्यांनी 'रिमोट ई-व्होटिंग'द्वारे ठरावांवर मतदान केलेले नाही (तसेच ज्यांना मतदान करण्यास इतर कोणत्याही प्रकारे मनाई नाही), ते सभेदरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. क) ज्या सदस्यांनी सभेपूर्वी 'रिमोट ई-व्होटिंग'द्वारे मतदान केले आहे, ते सभेत उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नसेल; आणि ड) केवळ अशाच व्यक्ती 'रिमोट ई-व्होटिंग' किंवा सभेदरम्यान ई-व्होटिंग सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असतील, ज्यांची नावे 'कट-ऑफ' तारखेला सदस्य नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजकडे असलेल्या 'बेनिफिशियल ओनर्स'च्या नोंदवहीत नोंदवलेली आहेत;

एच. डीमटेरियलाइज्ड स्वरूपात आणि प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांसाठी, तसेच ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत अशा सदस्यांसाठी 'रिमोट ई-व्होटिंग'ची पद्धत एजीएम च्या सूचनेत दिली आहे. याचे तपशील कंपनीच्या वेबसाइटवरही उपलब्ध करून दिले जातील. सदस्यांना विनंती आहे की त्यांनी या तपशीलांसाठी www.firstsource.com या वेबसाइटला भेट द्यावी;

आय. ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना विनंती आहे की त्यांनी 'डिपॉझिटरी पार्टिसिपंट'द्वारे संबंधित डिपॉझिटरीजकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदवावेत. तसेच, प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की, २५ व्या एजीएम ची सूचना, 'रिमोट ई-व्होटिंग'साठीच्या सूचना, व्हीसी द्वारे सभेत सहभागी होण्याबाबतच्या सूचना आणि वार्षिक अहवाल २०२५-२६ च्या इलेक्ट्रॉनिक प्रती मिळवण्यासाठी त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, '३आय इन्फोटेक लिमिटेड' यांच्याकडे fsl@3i-infotech.com या ईमेलवर त्यांचे ईमेल पत्ते अद्ययावत करावेत;

जे. ई-मतदानाबाबत काही शंका किंवा समस्या असल्यास, आपण www.evotingindia.com वरील 'मदत' विभागात उपलब्ध असलेले 'सतत विचारले जाणारे प्रश्न' आणि ई-मतदान मार्गदर्शक पुस्तिका (मॅन्युअल) पाहू शकता; किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल करू शकता अथवा १८०० २१ ०९९११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकता;

के. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदान करण्याच्या सुविधेबाबतच्या सर्व तक्रारी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक (सीडीएसएल), सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅराथॉन फ्युचरक्स, मफतलाल मिल कंपाउंड्स, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई – ४०००१३ यांच्याकडे पाठवल्या जाऊ शकतात; किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल केला जाऊ शकतो अथवा १८०० २१ ०९९११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधला जाऊ शकतो.

फर्स्टसोर्स सोल्युशन्स लिमिटेड करिता
संचालक मंडळाच्या वतीने
सही/–
स्थळ : मुंबई — **पूजा नंबियार**
दिनांक : जुलै १४, २०२६ — **कंपनी सचिव**